**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक -ससं/उशि/नार्को समन्वयक नेमणूक/पुवि/२०२४/7069 दि. ~~२७/०९/२०२४~~ १५.१०.२०२४

**महत्वाचे**

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे विभाग,

३. प्राचार्य / प्राचार्या, सर्व अशासकीय अनुदानित /कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, **पुणे जिल्हा.**

विषय - **विद्यापीठामध्ये व महाविद्यालयामध्ये अंमली पदार्थांना आळा घालणेबाबत जनजागृती करणेबाबत..**

संदर्भ - १. या कार्यालयाचे पत्र क्र. नार्को को-ऑर्डीनेशन/२०२४/२६१४ दिनांक २७.७.२०२३.
२. मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७.०९.२०२४ रोजी घेण्यात आलेली बैठक.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, शासनाच्या गृह विभागाच्या पत्रान्वये जिल्हयातील वाढत्या अंमली पदार्थांच्या वापरावर आळा घालण्यासाठी तसेच क्षेत्रीय स्तरावरील अंमली पदार्थाबाबतची समस्या प्रभावीपणे हाताळण्यासाठी जिल्हास्तरीय NCORD समित्या जिल्हयांमध्ये प्रभावीपणे कार्यान्वित करण्याच्या सचूना मा. केंद्रीय गृहमंत्री यांनी दिलेल्या आहेत.

पुणे जिल्हयातील अंमली पदार्थांच्या वापरावर आळा घालण्यासाठी नार्को कोऑर्डीनेशन सेंटर (Narco Co-Ordination-NCORD) अंतर्गत सुधारीत समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीची ऑनलाईन बैठक दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ रोजी घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये दिलेल्या सूचनेनुसार आपल्या विद्यापीठामध्ये / महाविद्यालयांमध्ये अंमली पदार्थांबाबत जनजागृती करावी तसेच सदर कार्यक्रमासाठी आपल्या महाविद्यालयातील एका प्राध्यापकांची कायमस्वरुपी समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात यावी. तसेच सदर समन्वयकाचे नांव व मोबाईल क्रमांक खालील तक्त्यामध्ये या कार्यालयास ई-मेलद्वारे सादर करण्यात यावा. सदर समन्वयकांनी आपल्या विद्यापीठामध्ये व महाविद्यालयामध्ये अंमली पदार्थांना आळा घालणेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे तसेच अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणा-या दुष्परिणामांबाबत विदयार्थ्यांमध्ये जागृती करावी तसेच वेळोवेळी शासन व गृहविभाग यांचेकडून येणा-या सूचनांचे पालन करावे.

| अ.क्र. | समन्वयकाचे नांव व पदनाम | समन्वयकांचा मोबाईल नंबर | समन्वयकांचा ई-मेल |
|---|---|---|---|
| | | | |

(डॉ. अशोक उबाळे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १